# बुध्दं शरणं गच्छामि - भाग १



बुध्दिस्ट सर्किट ट्रेनने बुद्धाच्या जीवनातील महत्त्वाच्या ठिकाणांना भेट

मागच्या ऑगस्टमध्ये मी 'डिप्लोमा इन बुद्धिस्ट स्टडी' हा ऑनलाइन कोर्स सुरु केला. (म्हणजे मी स्टुडंट म्हणून जॉईन केला). डिप्लोमा मिळवणे हा उद्देश नसून बुद्धाची शिकवण जाणून घेणे हा उद्देश होता. कोर्समध्ये खूप जगभरातील बुद्धिस्ट ठिकाणांची माहिती दिली. त्यामुळे या ठिकाणांना भेट देण्याची इच्छा निर्माण झाली. अशातच IRCTC ची बुद्धिस्ट सर्किट ट्रेनची ई-मेल आली. त्यात

भारताबरोबरच नेपाळ मधील लुंबिनी - म्हणजे जिथे बुद्धाचा जन्म झाला त्या ठिकाणांचा समावेश होता. म्हणून जास्त विचार न करता बुकिंग करून टाकले. ४ नोव्हेंबर ते ११ नोव्हेंबर माझे बुद्धाबरोबर भेटीचे बुकिंग झालेसुद्धा!




बुकिंग केले तेव्हा जॉब सोडलेला होता, पण ऑगस्टमध्ये कैथल, हरियाणा मध्ये जॉब घेणार होते. लगेच ३ महिन्यांनी ८ दिवस सुट्टी मिळेत की नाही ही शंका होती. पण त्यांनी सुट्टी तर दिलीच, पण कैथल-दिल्ली आणि दिल्ली-कैथल कार सुद्धा देऊ म्हणून सांगितले. तरीही जाण्याचा दिवस जसजसा जवळ येऊ लागला तसतसे वेगवेगळे विचार येऊ लागले. एवढ्या दिवसांची ट्रीप पूर्ण अनोळखी लोकांबरोबर करण्याची माझी पहिलीच वेळ होती. रूममध्ये, ट्रेनमध्ये बरोबर कोण असेल, ॲडजस्ट होईन का? वगैरे प्रश्न मनात येत होते. पण होईल सगळे नीट म्हणून ४ नोव्हेंबरला सकाळी सवासातला कारने निघाले. खरा ४ तासांचाच रस्ता, पण दिल्लीत शिरल्यावर ट्रॅफिक जॅम मुळे बरोबर साडेबारा वाजता सफदरजंग स्टेशनवर पोचले.



इथे आल्यावर मात्र सगळ्या शंका दूर झाल्या. सर्व यात्रिकांचे गंध लावून आणि गळ्यात तुळशीची माळ घालून स्वागत केले गेले. बसण्याची सोय होती आणि मंगलवाद्ये वाजत होती. चहा/ कॉफी/ सॉफ्ट ड्रिंक्स/स्नॅक्स सगळे काही होते.

**दि. ४ नोव्हेंबर - दिवस पहिला**


दोन वाजता ट्रेन आली. ही टुरिस्ट ट्रेन आहे.
गाडीला 2 टायर ए. सी, फर्स्ट क्लास ए.सी, पॅन्ट्री म्हणजे रसोईयान, डायनिंग कार एवढेच डबे आहेत. अंघोळ करण्यासाठी बाथरूम, त्यात गिझरने गरम पाणी मिळण्याची सोय, सगळे आहे. ट्रेन सुरु झाल्यावर चहा-कॉफी, नाश्ता मिळाला. रात्री आठ वाजता जेवण आणि मग झोप. उद्या सकाळी आठ वाजता गया स्टेशनवर उतरून बोधगयेकडे प्रयाण!

**दि. ५ नोव्हेंबर - दिवस दुसरा**

सकाळी ९ वाजता ट्रेन गया स्टेशनवर पोचली. तिथे उतरून आम्ही बसने बोधगयेकडे निघालो. दहा वाजता बोधगया शहरात पोचलो. गया - बोधगया बिहारमध्ये आहे. गौतम बुद्ध हा ज्ञानप्राप्ती होण्याआधी राजपुत्र सिद्धार्थ होता. तो सर्व सुखांचा उपभोग घेत होता. २९ वर्षे वयापर्यंत भोग घेण्याच्या अत्युच्च पातळीवर होता. पण त्याला त्यातला फोलपणा समजला आणि तो ज्ञानप्राप्तीसाठी संसार त्यागून धर्मारण्य ह्या ठिकाणी आला. त्या काळच्या श्रमणाप्रमाणे त्याने उपभोग तर सोडलेच

पण गरजाही सोडल्या. त्याने अन्न, पाणी, कपडे सगळ्याचा त्याग केला. असे अनेक वर्ष शरीर कष्टवून तो अस्थिपंजर झाला, पण त्याला ज्ञान मिळाले नाही. ही त्यागाची अत्युच्च पातळी होती. धर्मारण्य हयाच ठिकाणी त्याने मध्यम मार्ग अवलंबण्याचा निश्चय केला. म्हणजेच भोग सोडायचे पण गरजा भागवायच्या. शरीर जगवण्यापुरते अन्न घ्यायचे. त्याने ज्या दिवशी हे ठरवले त्याच दिवशी सुजाता नावाची स्त्री तिथे आली. सिद्धार्थ ज्या पिंपळ वृक्षाखाली बसता होता त्या वृक्षाला वहायला तिने खीर आणली होती. तिने वृक्षदेवता समजून बुद्धाला खीर दिली. त्याने ती खाल्ली. त्याच क्षणी ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया सुरू झाली. पण बाकीच्या श्रमणांना हे आवडते नाही. बुद्धाचे पाच मित्र त्याच्याबरोबर होते त्यांनीही त्याला सोडले. म्हणून तो धर्मारण्य सोडून निरंजना नदी पार करून गेला. तिथे पिंपळवृक्षाखाली ध्यान लावून बसला. तेथे त्याला ज्ञान प्राप्ती झाली. धर्मारण्य येथे सुजाता मंदिर आहे. सुजाताचे घर जिथे होतो तिथे तिच्या स्मरणार्थ स्तूप बांधला आहे. हे दोन्ही आम्ही पाहिले. जिथे ज्ञानप्राप्ती झाली त्या पिंपळ वृक्षाला बोधी वृक्ष म्हणतात. तिथे महाबोधी टेंपल आहे. ते बघायला दुपारी जाऊ. पण तिथे मोबाईलला मनाई आहे त्यामुळे फोटो काढता येणार नाहीत.



दुपारी तीन वाजता निघून आधी जपानी, थाई बुद्धिस्ट टेंपल्स आणि बुद्धाची ८० फूट उंच मूर्ती पाहिली. मग मोबाईल्स बसमध्ये ठेवून महाबोधी टेंपल पहायला गेलो. हे मंदिर बोधी वृक्षाच्या पुढे सम्राट अशोकाने ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकात बांधले. मात्र मूळ बोधीवृक्ष अशोकाच्या राणीने - तिस्यरक्षिता हिने कापला. पण त्याची एक फांदी अशोकाने आधीच आपल्या मुलांबरोबर श्रीलंकेला



पाठवली होती. त्याचा तोपर्यंत वृक्ष झाला होता. त्याची फांदी पुन्हा मूळ जागी लावली. आता जो बोधी वृक्ष आहे तो मूळच्या बोधी वृक्षाचा नातू आहे. बोधी टेंपल खूपच सुंदर आहे. चारी बाजूंना कोरीव काम केलेल्या बोधिसत्वांच्या मूर्ती आहेत. ते खूप नीट बघण्याइतका वेळ नव्हता. मात्र बुद्धमूर्तीवरून नजरच हटत नाही. तिला सोनेरी मुलामा दिलेला आहे. पिवळी वस्त्रे घातली आहेत. डोळे, भुवया छान निळ्या रंगाच्या आहेत. डोळे अर्धवट मिटलेले, ओठ गुलाबी, सरळ नाक, कानाच्या पाळ्या खांद्यापर्यंत, डोक्यावर केसांचा उंच बुचडा ! फोटो काढायचा नसल्याने दोन वेळा जाऊन डोळ्यांत साठवून घेतला. नंतर बोधीवृक्षाचे दर्शन घेतले.




ज्ञानप्राप्ती नंतर बुद्ध सात आठवडे त्या परिसरात राहिता. पहिला आठवडा बोधी वृक्षाखाली, दुसरा आठवडा बोधी वृक्षासमोर, तिसरा आठवडा वृक्षाला प्रदक्षिणा घालत घालवला. तेव्हा त्याची पावले जिथे पडली, त्या त्या जागी कमळे फुलली. चौथा आठवडा पथ्थान सूक्ताचा विचार करत, पाचवा आठवडा आपला मोक्ष जन्माने नाही तर कर्माने मिळतो हे समजावत घालवला. सहाव्या आठवड्यात त्याची परीक्षा पाहण्यासाठी वादळ आले, अनेक प्राणी अंगावर आले पण त्याचे ध्यान तुटले नाही. तेव्हा एका नागराजाने त्याच्यावर फणा धरून त्याचे रक्षण केले. तर पावसाच्या पाण्याचे तळे बनले. हे तळे आणि बुद्धमूर्ती फारच सुंदर आहे. सातवा आठवडा एका झाडाखाली घालवता. ४९ व्या दिवशी दोन व्यापारी त्याची कीर्ती ऐकून तिथे त्याची शिकवण घेण्यासाठी आले. त्यांना बुद्धं सरणम् गच्छामि। धर्म सरणं गच्छामि। हे मंत्र दिले. तेव्हा त्यांनी दिलेली मिठाई खाऊन ४९ दिवसांचा उपास सोडला.



परिसरात खूप votive स्तूप आहेत म्हणजे नवस फेडण्यासाठी दान केलेले स्तूप. असंख्य बौद्ध भिक्खू आणि भिक्खुणी होत्या. आमच्यासारखे टुरिस्ट होते. २ तास हे सगळे अनुभवून हॉटेल मध्ये परत आलो.

**दि. ६ नोव्हेंबर - दिवस तिसरा**

आज सकाळी आधी नालंदा युनिव्हर्सिटीचे अवशेष बघायला गेलो. गौतम बुद्धाचा प्रिय शिष्य सारीपुत्र ह्याने बुद्धाची शिकवण देण्यासाठी छोट्या प्रमाणात हिची सुरुवात केली. ख्रिस्तपूर्व २०० ला सुरू झालेली ही युनिव्हर्सिटी १०० वर्षांत खूप मोठी झाली.



देश विदेशातून इथे शिकण्यासाठी विद्यार्थी येत होते. १०,००० विद्यार्थी इथे शिकत होते. पण बाराव्या शतकात (११९८) बखतीयार बिन खिलजी ह्याने ती पूर्ण जाळली. नंतर Hyu en tsang, Fa Hin ह्यांच्या प्रवास वर्णनातून माहिती मिळून Alexander Cunningham ह्याने तिचे ठिकाण नक्की करून उत्खनन सुरू केले. तेव्हा तिचे अवशेष सापडले. एकूण १०० चौ. कि.मी. परिसरात पसरलेल्या ह्या युनिव्हर्सिटीचे आतापर्यंत १ चौ. कि.मी. एवढेच उत्खनन झाले आहे. गेटमधून आत गेल्यावर समोर सारीपुत्राचा स्तूप आहे.




डाव्या बाजूला प्राध्यापकांच्या राहण्याच्या खोल्या आहेत. उजव्या बाजूला एका बाजूला चैत्य तर एका बाजूला वेगवेगळी डिपार्टमेंट्स आणि विद्यार्थ्यांना राहण्यासाठी खोल्या आहेत. ह्या सर्व अनेकमजली इमारती होत्या पण आता फक्त पाया आणि काही भिंती शिल्लक आहेत. उप कुलपतीच्या खोलीत शून्यगार म्हणजे मेडिटेशन साठी गुहेसारखी जागा आहे. एक भव्य conference hall आहे, धान्य साठवण्याच्या खोल्या आहेत, जिथे आतले तापमान खूप कमी असते. पाणी साठवण्याच्या विहिरी आहेत. ड्रेनेज सिस्टीम आहे. नंतर आम्ही विद्यार्थ्यांना राहण्याच्या खोल्या बघितल्या. हे सर्व

बांधकाम विटांनी केलेले आहे. दोन विटांच्या मध्ये विटांची पूड, चुनखडी आणि स्ट्रॉ पावडर ह्यांचे मिश्रण वापरून त्या चिकटवल्या आहेत.



प्रत्येक इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ दोन बाजूंना दोन कोनाडे आहेत. एकात बुद्धाची भूमीस्पर्श मुद्रा असलेली मूर्ती, तर दुसऱ्या बाजूला उपदेश मुद्रा असलेली मूर्ती आहे. भूमिस्पर्श मुद्रा विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी तर उपदेश मुद्रा शिक्षकांना प्रेरणा देण्यासाठी होती. ह्या युनिव्हर्सिटीच्या लायब्ररीत हजारो पुस्तके होती त्यातली काही चिनी प्रवाश्यांनी चीनला नेली आणि त्यातून महायान बुद्धिझम

जास्त प्रमाणात सर्वत्र पसरले.

खूप पुस्तके, लाकूड असल्याने आग खूप काळ धुमसत राहिली त्यामुळे विटा अक्षरशः वितळल्या आहेत. फक्त काही ठिकाणी इमारतींच्या भिंतींवर केलेले कोरीव काम शिल्लक आहे. त्यात वेगवेगळ्या बुद्धिस्ट देवतांच्या मूर्ती आहेत. त्या काळात सर्व भिंती कोरीव कामाने सुशोभित केलेल्या होत्या. हे आम्ही लांबूनच पाहिले. एक/दोन फोटो घेतले. सगळे अगदी नीट बघायचे तर ह्यासाठीच खूप दिवस लागतील.

त्यानंतर समोरच म्युझियम आहे ते पाहिले. त्यात उत्खननात सापडलेल्या मूर्ती ठेवल्या आहेत. बुद्धाच्या, अवलोकितेश्वर, तारा इ. देवतांच्या मूर्ती त्यात आहेत.

नालंदा हे नाव नालग्राम ह्या सारीपुत्राच्या गावाच्या नावावरून आले आहे. हे राजगीरच्या जवळ आहे.

(क्रमशः)

**- डॉ. मंजिरी मणेरीकर**